# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/१०/२०१६

**१) घरातील ताला तोडुन सोन्याच्या साहित्याची चोरी . :–**

दिनांक २०/१०/२०१६ रोजी १०.०० ते १४.०० वा. दर. यातील फिर्यादीचे जुने घराचे वखारीत ठेवलेली घराची चाबी कोणीतरी अज्ञात चोराने काढुन चाबीने समोरील राहते घराचा ताला उघडुन आत प्रवेश करुन सुटकेस मधुन स्टीलचे डब्यात ठेवलेला सोन्याचा १ मंगळसुत्र १० ग्रॅम, सोन्याच्या २ अंगठया प्रत्येकी ०५ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स १ जोळ, सोन्याचा लॉकेट १.५ ग्रॅम असा एकुण ५०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी सौ दुर्गा विलास चाचेरे वय ४५ वर्ष, रा. बाजार पेठ अडयाळ यांचे तोंडी वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५४,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) घराच्या खिडकी जवळील खुंटीवर टांगलेल्या फुलपॅन्टचे खिशातुन नगदी पैशाची चोरी . :–**

दिनांक १९/१०/२०१६ रोजी १४.०० ते १८.०० वा. दर. यातील फिर्यादीची पत्नी मुले घरी हजर असतांना त्यांची नजर चुकवुन खुल्या दारातुन संशयीत आरोपीने घरात प्रवेश करुन माज घरात खिडकी जवळील खुंटीवर टांगलेल्या फुलपॅन्टचे खिशात ठेवलेले नगदी ६५,५००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी मोहण पनतु राघोर्ते वय ३१ वर्ष, रा. सुरेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो. स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३)बिना रॉयल्टीने गौन खनिज ०१ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०/१०/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन शासनाचे आदेशान्वये रेती घाट बंद असतांना बिना रॉयल्टीने धर्म काटयाचे बाजुला असलेली गौन खनिज रेती आपल्या ट्रॅक्टरचे ट्रॉली मध्ये ०१ ब्रास रेती कि. ५,०००/–रु. ची चोरीने भरुन शासनाचा महसुल बुडवुन स्वत:चे आर्थीक लाभा करीता मांगली शिवार धर्मकाटा समोर येथुन चोरुन नेतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. पेंदाम यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,१०९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २०/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. लाखांदुर येथील जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन कि. ११०/–रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

21/10/16

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.